Tip Top 24 NEWS
सोमवार
दि. 27 मे २०२४
MH-26-0496625
मो.9529178275 : tiptopnews21@gmail.com



# केकेआरने 10 वर्षानंतर पुन्हा ट्रॉफीवर नाव कोरले

मुंबई- केकेआरने १० वर्षांनंतर पुन्हा ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. कोलकाताने तिसऱ्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. यापूर्वी गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली केकेआरने २०१२ आणि २०१४ मध्ये ट्रॉफी जिंकली होती. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ११३ धावा केल्या. प्रत्युत्तरात कोलकाताने सहज लक्ष्य गाठले. कोलकाता नाईट रायडर्स आयपीएल २०२४ चा चॅम्पियन संघ ठरला आहे. सनरायझर्स हैदराबादचा ८ विकेट्सने पराभव करत मोठा विजय नोंदवला. हैदराबादने केकेआरला विजयासाठी अवघ्या ११४ धावांचे सोपे आव्हान दिले होते. कोलकाता



संघाने अवघ्या षटकांत हे आव्हान सहज गाठले. व्यंकटेश अय्यर आणि रहमानउल्ला गुरबाजच्या ९१ धावांच्या भागीदारीच्या जोरावर झटपट धावा केल्या. व्यंकटेश अय्यरने २६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकार लगावत ५२ धावा केल्या तर आंद्रे रसेलने ३ विकेट्स घेत चेंडूने चांगली कामगिरी केली. तर केकेआरच्या गोलंदाजांनी अंतिम सामन्यात चेंडूने हाहाकार केला. अंतिम सामन्यात केकेआर संघाच्या गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर संघाच्या फलंदाजांकडून अशाच खेळाची अपेक्षा होती. कोलकाता नाईट रायडर्स संघाची सुरुवात चांगली झाली नाही ज्यात त्यांनी ११ धावांवर सुनील नारायणच्या रूपात पहिली विकेट गमावली, जो केवळ ६ धावा करत पॅट कमिन्सचा बळी ठरला. यानंतर फलंदाजीला आलेल्या व्यंकटेश अय्यरने रहमानउल्ला गुरबाजसह आक्रमक खेळी करत संघाची धावसंख्या पहिल्या ६ षटकांत १ गडी गमावून ७२ धावांवर नेली. या सामन्यात दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ४५ चेंडूत ९१ धावांची भागीदारी करून सामना पूर्णपणे एकतर्फी केला. गुरबाजच्या बॅटमधून ३९ धावांची खेळी पाहायला मिळाली. तर व्यंकटेश अय्यर या सामन्यात संघाला विजेतेपद मिळवून देऊन परतला ज्यात त्याने ५२ धावांची उत्कृष्ट खेळी केली. हैदराबादसाठी या सामन्यात पॅट कमिन्स आणि शाहबाज अहमद यांनी गोलंदाजीत १-१ विकेट घेतली.

## आरटीई : १ लाख ४७ हजारांहून अधिक अर्ज दाखल

**पुणे**-: राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. या अंतर्गत आतापर्यंत १ लाख ४७ हजारांहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे आता शाळा प्रवेशासाठी सोडत काढावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे. आरटीईअंतर्गत वंचित, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. त्यानुसार खासगी शाळांतील प्रवेशासाठीची अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यंदा राज्यभरातील ९ हजार १९७ शाळांमध्ये १ लाख ४ हजार ७३८ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. ३१ मे ही अर्ज नोंदणीसाठीची अंतिम मुदत आहे. त्यामुळे आतापर्यंत आलेल्या १ लाख ४७ हजार अर्जांमध्ये आणखी अर्जांची भर पडणार आहे. उपलब्ध जागांपेक्षा जास्त अर्ज दाखल झाल्याच प्रवेशासाठी सोडत काढावी लागते. त्यामुळे उपलब्ध जागांपेक्षा जास्त अर्ज आले असल्याने आता प्रवेशासाठी सोडत काढावी लागणार आहे.

## पब, रुफटॉप हॉटेल्सवर कारवाई

**पुणे:** पोर्शे कार अपघातानंतर पुण्यातील बार आणि रुफ टॉप हॉटेलवर (Pune Pub and Bar) कारवाई करण्यात आली. त्यानंतर आता पिंपरी-चिंडवड महापालिकादेखील खडबडून जागी झाली झाली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून आता पिंपरी-चिंचवड परिसरातील वाकड भागात रूफ टॉप हॉटेलवर हातोडा चालवला आहे.

तसेच बाणेर मधील एकूण 9 रुफ टॉप हॉटेलवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याव्यतिरिक्त दोन हॉटेल वर गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार देण्यात आली आहे. 9000 चौ फुट क्षेत्रफळाचे अनधिकृत रूफ टॉप हॉटेल्स पाडण्यात आले.

पिंपरी-चिंचवडमधील बाणेर, बालेवाडी आणि वाकड परिसरात अनेक पब आणि रुफ टॉप हॉटेल्स आहे.

या परिसरात यामुळे अनेक नागरिकांना त्रास होतो. अनेकदा नागरिकांनी तक्रारी दिल्या आहेत.

मात्र कारवाई करण्यात आली नाही. त्यासोबतच रात्री दीडनंतरदेखील या परिसरातील अनेक पब आणि हॉटेल्स सुरु असतात. तरुणांचा रात्रीचा धिंगणा सुरुच असतो. कोरेगाव परिसरातील याच रात्रीच्या धिंगाण्यामुळे दोघांचा जीव गेला. अशीच घटना पुन्हा होऊ नये म्हणून अनेक परिसरातील पब आणि रुफ टॉप हॉटेलवर करावाई करण्यात येत आहे.

## वरुणराजा जोमात; बळीराजा कोमात

पुणे- उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना एकीकडे दिलासा मिळत असला तरी दुसरीकडे मात्र पावसाने हाहाकार माजवत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी वीज पडण्याच्या घटना घडल्या आहेत. राज्यात सोलापूर, लातूर, माढ्यासह वाशिम जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावलीये. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून चाकूर येथे वीज पडून दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी दुःखद घटना घडली आहे. शिवाजी नारायण गोमचाळे आणि ओंकार लक्ष्मण शिंदे असे मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे आहेत.

वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळ प्रचंड नुकसान झालं आहे. माढा तालुका परिसरात साधारणत अर्धा तास तीव्र स्वरूपाचं वादळ होतं. समोरच काहीच दिसत नव्हत. यामध्ये मोठं मोठी झाडं उन्मळून पडली आहेत. घरांचे मोठं नुकसान झालं आहे. शेतीच्या पिकांच, जनावरांच, विजेच्या खांबांचं मोठं नुकसान झालं आहे. 30 ते 35 वर्षापासून असलेली आंब्याची झाडं डोळ्यादेखत उन्मळून पडली आहेत.सोलापुरात ढगांच्या गडगडाटसह सोलापूर शहर आणि परिसरात पावसाने जोरदार बॅटिंग केली आहे.

अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे नई जिंदगी परिसरातील नागनाथ नगर येथील अनेक घरावरचे पत्रे उडाले आहेत. जोरदार वादळी वाऱ्यामुळे दहा ते पंधरा घरांचे नुकसान झाले असून अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील बागायतदार शेतकऱ्यांची चिंता देखील वाढली आहे. उष्ण वातावरणानंतर संध्याकाळच्या सुमारास वाशिम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यामध्ये अनेक भागात वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे उकाड्याने हैराण असलेल्या नागरिकांना काही प्रमाणात का होईना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.